# वारकऱ्यांसाठी बीआरटी' मार्गावर विश्रांती केंद्र

**पिंपरी : वृत्तसंस्था**

देहू-आळंदी अशी पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांच्या सोयीकरिता महापालिकेच्या बीआरटीएस विभागाच्या वतीने प्रायोगिक तत्वावर या मार्गावर पाच ठिकाणी तुळशी वृदांवनासह विश्रांती निवारा केंद्र उभारण्यात येणार आहेत. यापैकी बोराडे वस्ती येथील एका केंद्राचे काम पूर्ण झाले असून, येत्या काही दिवसांतच या मार्गावरील पाचही ठिकाणचे कामे पूर्ण केली जाणार असल्याची माहिती बीआरटीएस प्रवक्ते विजय भोजने यांनी दिली.



वारकरी संप्रदायातील वारकऱ्यांच्या दृष्टीने देहू-आळंदी या दोन्ही तीर्थक्षेत्रांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. दर महिना, पंधरा दिवसांच्या एकादशींबरोबरच आषाढी व कार्तिकी वारीदरम्यान या मार्गावर पायी ये-जा करणाऱ्या वारकऱ्यांची संख्या मोठी असते.

पिंपरी-चिंचवड महापालिकेची हद्द या दोन्ही तीर्थक्षेत्रांना भिडलेली आहे. महापालिकेच्या हद्दीतून देहू-आळंदी रस्ता जातो. 30 मीटर रुंदीच्या या रस्त्यावर बीआरटीएस सुरू करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीने वारकऱ्यांना काही काळ विश्रांती घेण्यासाठी विश्रांती निवारा केंद्र उभारण्याचा विचार तत्कालीन आयुक्त राजीव जाधव यांनी बोलून दाखविला. त्यानंतर बीआरटीएस विभाग कामाला लागला. या विभाकडून देहू-आळंदी रस्त्याची पाहणी करण्यात आली. तसेच वारकऱ्यांना विश्रांती घेण्यासाठी काही जागा निवडण्यात आल्या. त्यानुसार बोराटेवस्ती येथील कमलराज विहार या गृहरचना संस्थेनजीकच्या पदचारी पथावर पहिले विश्रांती निवारा केंद्र उभारण्यात आला आहे. एकूण साडे तीन मीटर रुंद असलेल्या या निवाऱ्याची पादचाऱ्यांना अडचण होऊ नये, याकरिता दीड मीटर जागा पादचाऱ्यांना ये-जा करण्यासाठी सोडण्यात आली आहे. द

रम्यान, या विश्रांती निवारा केंद्राची उभारणी नागरिकांची वर्दळ असलेल्या भागात करण्यात आली असून, त्यामुळे या निवाऱ्याचे पावित्र्य आबाधित राहून त्याकडे लक्षदेखील राहील, असे यामागील नियोजन असल्याचे सांगण्यात आले आहे.

## डंपरखाली सापडल्याने मुलाचा मृत्यू



पिंपरी - डंपरखाली सापडल्याने मुलाचा गुरुवारी (ता. ९) जागीच मृत्यू झाला. पिंपरीगाव-पिंपळे सौदागर रस्त्यावर नवमहाराष्ट्र विद्यालयाच्या मागील बाजूस हॉटेल समृद्धीशेजारी सायंकाळी सहाच्या सुमारास हा अपघात घडला.

शंतनू प्रशांत सुतार (वय ७, रा. बालामन चाळ, पिंपरीगाव) असे त्या मुलाचे नाव आहे. डंपरचालक जावेद हमीद शेख (वय २६, रा. पिंपळगाव, जि. जालना) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. हॉटेल समृद्धीशेजारील मोकळ्या भूखंडात म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पाचे काम खासगी कंत्राटदारामार्फत सुरू आहे. येथून हा डंपर बाहेर येत होता. त्या वेळी शंतनू या डंपरच्या चाकाखाली सापडला. त्याचा जागीच मृत्यू झाला. स्थानिक नागरिकांनी डंपरवर दगडफेक करून त्याच्या काचा फोडल्या. चालकाने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, लोकांनी त्याला पकडून चोप दिला. तसेच, पोलिसांच्या हवाली केले. पिंपरी पोलिस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते

# मराठा आरक्षणासाठी राज्य सरकारचा उच्च न्यायालयात अर्ज

### स्थगितीपुर्व नोकर भरती, शैक्षणिक प्रवेश कायम करण्यासाठी अर्ज

**मुंबई:** काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारने 2014 मध्ये मराठा आरक्षण लागू केले आणि त्याचा वटहुकूम जारी केला. याविरोधात न्यायालयात डझनभर याचिका दाखल झाल्या. या याचिकांवर सुनावणी घेताना न्यायालयाने 2014 मध्येच हे आरक्षण स्थगित केले आणि या याचिका अंतिम सुनावणीसाठी दाखल करून घेतल्या. परंतू, न्यायालयाने स्थगिती देण्याआधी मराठा आरक्षणानुसार केलेली सरकारी नोकर भरती आणि शैक्षणिक प्रवेश कायम करण्यासाठी राज्य सरकारने उच्च न्यायालयात अर्ज केला आहे. या अर्जावर येत्या काही दिवसात सुनावणी होण्याची शक्यता आहे. न्यायालयाने स्थगिती देण्याआधी सरकारने मराठा आरक्षणानुसार काही शैक्षणिक प्रवेश दिले आणि सरकारी नोकर भरती केली. त्यानंतर या आरक्षणाअंतर्गत नोकर भरती व शैक्षणिक प्रवेश दिलेले नाहीत. त्यामुळे आधी दिलेले शैक्षणिक प्रवेश आणि नोकर भरती न्यायालयाच्या अंतिम निकालाने प्रभावित होऊ नये म्हणून ते कायम करण्याची परवानगी न्यायालयाने द्यावी, अशी विनंती करणारा अर्ज सामाजिक न्याय विभागाने मुख्य सरकारी वकील अभिनंदन वग्याणी यांच्यामार्फत न्यायालयात केला आहे.



या अर्जावर तातडीने सुनावणी घ्यावी अशी विनंती याचिकाकर्ते केतन तिरोडकर यांनी बुधवारी न्या. अभय ओक व न्या. अमजद सय्यद यांच्या खंडपीठासमोर केली. सर्वोच्च न्यायालयाने 10 प्रकरणे सुनावणीसाठी या खंडपीठासमोर पाठवली आहेत. त्यावर तातडीने सुनावणी घेण्याचे आदेश दिले आहेत. अशा परिस्थितीत या अर्जावर तातडीने सुनावणी घेता येणार नाही. तुम्ही मुख्य न्यायाधीशांसमोर या अर्जावर सुनावणी घेण्यासाठी खंडपीठ आयोजित करण्याची विनंती करा, असे निर्देश देत न्यायालयाने या अर्जावर सुनावणी घेण्यास नकार दिला.

# भाजपा-शिवसेनेत पुन्हा जुंपले पोस्टरवॉर

**मुंबई : प्रतिनिधी**

देशात व राज्यातील सत्तेत एकमेकांचे सहकारी असलेल्या भारतीय जनता पक्ष व शिवसेना यांच्यातील कुरबुरी अद्यापही संपलेल्या नाहीत. कोणत्या ना कोणत्या तरी मुद्यावरून हे दोन्ही पक्ष एकमेकांवर कुरघोडी करण्याची एकही संधी सोडत नाहीत.




**(भाजपाचं सरकार म्हणजे निजामांच्या बापाचं राज्य : संजय राऊत)**

केंद्रात निजामाच्या बापाचं राज्य अशा शब्दात शिवसेना खासदार संजय राऊत यांनी मोदी सरकारवर केलेली टीका भाजपाला रुचली नाही. त्यावर ' इतरांना निजाम म्हणण्यापेक्षा आपण स्वत: औरंगजेबासारखे वागत आहोत का याचे शिवसेनेने आत्मपरीक्षण करावे ' असा प्रतिटोला भाजपाने शिवसेनेला हाणला. मात्र या मुद्यावरून सुरू झालेले युद्ध अजूनही संपलेले नसून आता भाजपाने पुन्हा 'पोस्टर'च्या माध्यमातून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व संजय राऊत यांच्यावर टीकास्त्र सोडले आहे. तसेच उद्धव ठाकरे यांना बेडकाची उपमाही देण्यात आली आहे.

देश पिताश्रींच्या पुण्याईवर आणि मातोश्रीच्या आशीर्वादाने नाही चालत त्यासाठी खऱ्याखुऱ्या संकटांचा सामना करावा लागतो' असा आशय लिहीलेलं एक पोस्टर सध्या सोशल मीडियावर चांगलचं व्हायरल झालं असून त्याखाली आय सपोर्ट नमो!' असेही लिहीण्यात आले आहे. तर दुस-या एका पोस्टरमध्ये 'पावसाळा आला की असे बेडूक डराव डराव करणारच....' असे लिहीण्यात आले असून त्यामध्ये शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंना बेडकाची उपमा दिली आहे. मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरच सेना-भाजपामधील वाद वाढताना दिसत आहेत.

# मॉन्सून शनिवारपर्यंत राज्यात दाखल

**पुणे** - दक्षिण कोकण- गोवा, उत्तर व दक्षिण कर्नाटक आणि किनारपट्टीचा उर्वरित भाग, मध्य अरबी समुद्र, आंध्र प्रदेश किनारपट्टी आणि मध्य बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागात येत्या 48 तासांत नैर्ऋत्य मोसमी वारे दाखल होण्यास अनुकूल स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे मॉन्सून तळकोकणमार्गे राज्यात शनिवारपर्यंत (ता. 11) प्रवेश करण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

नैर्ऋत्य मोसमी पावसाची उत्तरी सीमा आणखी उत्तरेकडे सरकली आहे. मॉन्सूनने गुरुवारी मध्य अरबी समुद्राच्या काही भागात, केरळ व तमिळनाडूच्या उर्वरित भागात, कर्नाटक किनारपट्टीच्या बहुतांश भागात, दक्षिण कर्नाटक, मध्य बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागात, रायलसीमा आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीच्या काही भागात मजल मारली आहे. दरम्यान, कोकणात मालवण, कुडाळ, कणकवली, सावंतवाडी, मडगाव, रोहा, रत्नागिरीत पूर्वमोसमी पावसाने हजेरी लावली आहे; तर मध्य महाराष्ट्रात कोल्हापूर, वाई, महाबळेश्वर, राधानगरी भागात काही ठिकाणी गुरुवारी पाऊस झाला.

पुढील दोन- तीन दिवसांत मेघगर्जनेसह पाऊस

दक्षिण कोकण- गोव्यात काही ठिकाणी जोरदार, तर विदर्भात तुरळक ठिकाणी गडगडाटी वावटळीसह शुक्रवारी (ता. 10) पाऊस होईल. तर, दक्षिण कोकण आणि गोव्यात शनिवारी (ता. 11) आणि रविवारी (ता. 12) मुसळधार पाऊस होईल. पुण्यातही पुढील दोन- तीन दिवसांत मेघगर्जनेसह पाऊस पडेल, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविला आहे.

# डी कंपनीच्या ४ जणांना अटक

### छोटा राजनच्या हत्येचा प्रयत्न उधळला

**नवी दिल्ली** : अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजन याला मारण्याच्या तयारीत असणाऱ्या डी कपंनीच्या चार हल्लेखोरांना दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे.



चारही हल्लेखोर अंडरवर्ल्ड डॉन दाऊदचा उजवा हात छोटा शकील टोळीचे असल्याचे सांगण्यात येत आहे. इंडोनेशियातून राजनला अटक केल्यानंतर सध्या त्याला तिहार जेलमध्ये ठेवण्यात आले आहे. यानंतर डी कंपनीकडून राजनला संपवण्याचा हा पहिलाच प्रयत्न असल्याचे सांगण्यात येत आहे. चारही हल्लेखोर हे दिल्ली, नोएडा आणि एनसीआर परिसरात राहणारे होते. तसेच ते सतत छोटा शकीलच्या संपर्कात असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. पोलिसांनी या चारही आरोपींचे संभाषण टॅप करुन त्यांना अटक केले आहे. छोटा राजनला जेलमध्ये घुसून किंवा त्याला जेव्हा न्यायालयात हजर केले जाते, त्यावेळी संधी साधूनमारण्याचा कट या चौघांचा आणि पर्यायाने दाऊद कंपनीचा होता, असे म्हटले जात आहे. दरम्यान, यासर्व प्रकारामुळे छोटा राजनच्या सुरक्षेत आणखी वाढ करण्यात आली असल्याचे सांगण्यात येत आहे.

# संरक्षण व्यवहारातून दलाल हद्दपार - पर्रीकर

**नवी दिल्ली** : संरक्षण मंत्रालयाचे अधिकारी आणि शस्त्रविक्रेते यांच्यामधील दलालांना हद्दपार करण्यात सरकारला यश आल्याचे संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांनी आज सांगितले. एनडीए सरकारचे हे सर्वांत मोठे यश असून, यामुळे संरक्षण व्यवहारात पारदर्शकता येईल, असेही ते म्हणाले.

गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या यंत्रणेला बदलण्यासाठी एकही जण तयार नव्हता. सर्वजण याकडे बुरसटलेल्या जुनाट विचारांनीच पाहत होते. त्यामुळे हा बदल घडवणे म्हणजे एक आव्हानच होते, असा दावाही पर्रीकरांनी या वेळी केला. आमच्या कार्यकाळात आम्ही ही दलालांची साखळी मोडून काढल्याचा उल्लेखही त्यांनी या वेळी आवर्जून केला. या बदलामुळे आता संपूर्ण मानसिकतेमध्येच बदल होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. हे भीतीचे आणि जुनाट मानसिकतेचे जोखड संपवून आता विश्वासाचे वातावरण येणार आहे. संपूर्णतः बदल घडले नाहीत, तरी काहीअंशी होणारे बदल हे मंत्रालयासाठी फायदेशीर असल्याचेही त्यांनी या वेळी नमूद केले. या वेळी पर्रीकरांनी राफेल व्यवहार, ऑगस्टा वेस्टलँड गैरव्यवहार आणि अन्य महत्त्वाच्या विषयांवर मते मांडली. ऑगस्टा वेस्टलँड चौकशीबाबत बोलताना ते म्हणाले, की तपास यंत्रणांकडे सध्या पत्रकारांचे आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणात हेराफेरी झाल्याचे मंत्रालयालाही माहीत असल्याचे त्यांनी सांगितले. मी कोणतेही शस्त्र एखाद्याच्या शिफारशीमुळे घेणार नाही किंवा कुणाच्याही सांगण्यावरून नाकारणार नाही. त्या वस्तूची किंमत आणि दर्जा योग्य असेल, तरच त्याबद्दल विचार केला जाईल. माझ्यात हे धाडस आहे म्हणूनच मी बोफोर्स तोफांना उत्तम म्हणू शकतो. यात झालेला भ्रष्टाचार हा दुर्दैवी होता; परंतु भ्रष्टाचार करणाऱ्यांना शासन होणे आवश्यक आहे, तोफांना नाही. - मनोहर पर्रीकर, संरक्षणमंत्री

# पाकने दहशतवाद सोडला तरच संबंध सुधारतील

**वॉशिंग्टन :** शांततेचा मार्ग परस्परपूरक असला पाहिजे, असे सुनावताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, पाकिस्तानने स्वत:हून निर्माण केलेला दहशतवादाचा अडथळा दूर केला, तरच भारत-पाकिस्तान मैत्रीचा मार्ग खुला होईल, असे मत व्यक्त केले. पाकिस्तानने दहशतवादाला कोणत्याही प्रकारचा पाठिंबा देणे पूर्णपणे थांबवावे. आमच्या संबंधांच्या मार्गात पाकिस्तानने स्वत:हून निर्माण केलेला दहशतवादाचा अडथळा दूर झाल्यास आमचे संबंध नवी उंची गाठू शकतील. पहिले पाऊल उचलण्यासाठी आम्ही तयार आहोत. मात्र, शांततेचा मार्ग परस्परपूरक असला पाहिजे, असे मोदी यांनी आज द वॉल स्ट्रीट जर्नलच्या संकेतस्थळावर प्रतिक्रिया पोस्ट करताना स्पष्ट केले.

एकमेकांशी भांडण्यापेक्षा भारत-पाकिस्तानने एकत्र येऊन गरिबीविरोधात लढा दिला पाहिजे, असे नमूद करून मोदी यांनी, दहशतवादावर अजिबात तडजोड केली जाणार नाही, असे ठाम मत व्यक्त केले. ते म्हणाले, की भारतावर दहशतवादी हल्ला करणाऱ्या अतिरेक्यांवर पाकिस्तान ठोस कारवाई करत नसल्यामुळे संबंध सुधारणेला मर्यादा येतात. शांतता आणि शेजाऱ्यांबरोबर चांगल्या संबंधांसाठी आपले सरकार स्थापनेच्या पहिल्या दिवसापासून प्रयत्नशील आहे. पण पाकिस्तानने दहशतवादाला पाठिंबा देणे पूर्णपणे थांबवले तरच हे शक्य आहे.